# WALK IN INTERVIEW

## पिंपरी चिंचवड महानगरपालिका ,पिंपरी पुणे – १८

### प्राथमिक शिक्षण विभाग

**घड्याळी तासिका तत्वावर सहा.शिक्षक व पदवीधर शिक्षक नेमणुक करणेबाबत.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्राथमिक शिक्षण विभागामार्फत शैक्षणिक वर्ष – २०१९ -२०२० केवळ या कालावधीसाठीच ऊर्दु , हिंदी व इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये घड्याळी तासिका तत्वावर शिक्षकांची आवश्यकता आहे. त्याकरीता खालील प्रमाणे शैक्षणिक अर्हताधारकांकडून समक्ष अर्ज मागविणेत येत आहेत.

**१) उर्दु माध्यमातून शिक्षण झालेल्या उमेदवारांकरिता :** - आवश्यक पदे – ३७ ↓

| अ.क्र. | शैक्षणिक अर्हता | आवश्यक पदे |
|---|---|---|
| | **सहा. शिक्षक (उपशिक्षक)** | |
| १ | एच.एस.सी - डी.एड, | १४ |
| | **पदवीधर शिक्षक** | |
| १ | एच.एस.सी - बी.ए - बी.एस.सी - बी.एड (विज्ञान विषय) | १२ |
| २ | एच.एस.सी - बी.ए - बी.एड. (समाजशास्त्र विषय ) | ११ |
| | **एकुण** | **३७** |

**२) हिंदी माध्यमातून शिक्षण झालेल्या उमेदवारांकरिता :** आवश्यक पदे – २१ ↓

| अ.क्र. | शैक्षणिक अर्हता | आवश्यक पदे |
|---|---|---|
| | **सहा. शिक्षक (उपशिक्षक)** | |
| १ | एच.एस.सी - डी.एड, | १७ |
| | **पदवीधर शिक्षक** | |
| १ | एच.एस.सी - बी.ए - बी.एस.सी - बी.एड (विज्ञान विषय) | २ |
| २ | एच.एस.सी - बी.ए - बी.एड. (भाषा विषय) | १ |
| ३ | एच.एस.सी - बी.ए - बी.एड. (समाजशास्त्र विषय ) | १ |
| | **एकुण** | **२१** |

**३) इंग्रजी माध्यमातून शिक्षण झालेल्या उमेदवारांकरिता :** आवश्यक पदे – १९ ↓

| अ.क्र. | शैक्षणिक अर्हता | आवश्यक पदे |
|---|---|---|
| | **सहा. शिक्षक (उपशिक्षक)** | |
| १ | एच.एस.सी - डी.एड, | ११ |
| | **पदवीधर शिक्षक** | |
| १ | एच.एस.सी - बी.ए - बी.एस.सी - बी.एड (विज्ञान विषय) | ३ |
| २ | एच.एस.सी - बी.ए - बी.एड. (भाषा विषय) | ३ |
| ३ | एच.एस.सी - बी.ए - बी.एड. (समाजशास्त्र विषय ) | २ |
| | **एकुण** | **१९** |

**अटी व शर्ती पुढील प्रमाणे आहेत.** कृ.मा.प.

clock basis teacher

अटी / शर्ती

१) घड्याळी तासिका नेमलेल्या शिक्षकांची नेमणुक ही तासिका तत्वावर आदेशाचे दिंनाकापासुन माहे-३० एप्रिल-२०२० पर्यत असेल. तथापि आवश्यकतेनुसार ही मुदत दिलेल्या कालावधीपुर्वी केव्हाही संपुष्टात आणण्याचे अधिकार प्राथमिक शिक्षण विभागास राहतील. त्यानंतर सदरचा कालावधी कोणतीही पुर्वसचना न देता आपोआप संपुष्टात येईल. त्यामुळे अर्जदारास कोणत्याही कायमपदी नेमणुकीचा हक्क प्राप्त राहणार नाही. तसेच नेमणुकी संदर्भात न्यायालयात दाद मागणार नाही. तसेच नियुक्तीच्या वेळी सदरच्या नेमणूकीबाबतचे हमीपत्र सादर करावे लागेल.

२) उमेदवाराने आपल्या अर्जासोबत शाळा सोडल्याचा दाखला, धारण केलेली शैक्षणिक व व्यवसायीक अर्हताविषयक प्रमाणपत्र, पदवीका, बी.एड. पदवी प्रमाणपत्र व गुणपत्रक , अनुभव प्रमाणपत्र, तसेच इतर आवश्यक प्रमाणपत्र व कागदपत्राच्या सत्य प्रती सादर करणे बंधनकारक आहे.

३) ज्या दिवशी प्राथमिक शिक्षण विभागास सदर सहा.शिक्षकांची आवश्यकता नसेल त्यावेळी कोणत्याही नोटीशी शिवाय सदर उमेदवारांची सेवा संपृष्टात आणण्यात येईल. या संबधीचे सर्व अधिकार प्राथमिक शिक्षण विभागाने राखुन ठेवले आहेत. तसेच पात्र उमेदवारांना नेमणुक देताना शिक्षक संख्या कमी – जास्त करण्याचा अधिकार प्राथमिक शिक्षण विभागास राहील.

४) उमेदवाराने सोबत दिलेल्या नमुन्यात सहा.शिक्षक व पदवीधर शिक्षक या पदासाठी अर्ज मा.प्रशासन अधिकारी, प्राथमिक शिक्षण विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्या नावाने करावा. सदरचा अर्ज **दि. ३१/०७/२०१९ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ०५.०० वाजेपर्यत समक्ष जुना 'ड' प्रभाग कार्यालय, कर्मवीर भा. पाटील मनपा प्राथ. शाळा, पिंपरीगाव,** येथे वेळेत सादर करावा.

५) निवड झालेल्या उमेदवारास घड्याळी तासिका मानधना व्यतिरीक्त मनपा मार्फत देण्यात येणाऱ्या कोणत्याही सोयी सुविधा हक्क व इतर आर्थीक लाभ व भत्ते देय राहणार नाहीत.

६) उमेदवाराने तासिकेप्रमाणेच मानधन अदा करणेत येईल.

७) अर्जदाराने अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही. निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर तसेच नियुक्ती झाल्यानंतरही अर्जदार विहित अर्ज / पात्रता धारण न करणारा, गैरवर्तन करताना दबाव तंत्राचा वापर करताना आढळल्यास संबंधिताची उमेदवारी अथवा निवड रद्द बादल होईल, तसेच काही आक्षेप आढळल्यास कोणतीही पुर्व सुचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करणेत येईल.

८) विहीत मुदत काळात प्राप्त न झालेल्या अर्जाचा विचार कोणत्याही परस्थितीत करणेत येणार नाही.

९) अर्जदाराने आपले अर्ज महापालिकेच्या जाहीरातीमध्ये विहित केलेल्या अर्जाप्रमाणे करणे बंधनकारक राहील. अन्यथा अर्ज बाद केले जातील.

१०) अपुर्ण माहिती व अटिची पुर्तता न करणा-या ऊमेदवाराचे अर्ज बाद करून अपात्र ठरविले जातील. अपात्र अर्ज कार्यालयात जमा करणेत येतील. याबाबत कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही.

११) सदरची निवड ही सहा. शिक्षक व पदवीधर शिक्षक पदासाठी केवळ तासिका तत्वावर व तात्पुरत्या व हंगामी स्वरूपाची आहे. ऊमेदवारास मनपा सेवेत राहण्याचा अधिकार मागता येणार नाही. सदरचे पद हे शैक्षणिक वर्ष – २०१९-२०२० या करीता व आवश्यकतेनुसार राहील.

१२) तसेच पवित्र प्रणाली मार्फत शिक्षक उपलब्ध झाल्यास घडयाळी तासिका तत्वावरील नियुक्त्या नियुक्त्या रद्द करण्याचे अधिकार प्राथमिक शिक्षण विभागाला राहतील.

१३) नियुक्तीच्या वेळी उमेदवारास रक्कम रूपये १००/- स्टॅम्प पेपरवर (नोटराईज्ड करून) मनपा सेवेत भविष्यात नोकरी बाबतचा कोणताही हक्क राहणार नाही. तसेच न्यायालयात दाद मागणार नाही. याबाबतचे हमीपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

सदरची जाहीरात व अर्जाचा नमुना वृत्तपत्रामध्ये व महापालिकेच्या WWW.pcmcindia.gov.in या संकेत स्थळावर पाहता येईल.जाहिरातीनुसार कार्यवाही करणे अथवा प्रक्रिया कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचा अंतिम निर्णय मा.अतिरिक्त आयुक्त सो.यांचा राहील.

**सही/-**
**आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका.
पिंपरी पुणे – १८.

clockbasisteacher

# ऊमेदवाराने करावयाचा अर्जाचा नमुना
## ऊर्दु / हिंदी / इंग्रजी

पासपोर्ट
आकाराचा
फोटो

प्रति,

**मा. प्रशासन अधिकारी सो.**
प्राथमिक शिक्षण विभाग,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी पुणे – १८ .

**विषय – सन २०१९ – २० या शैक्षणिक वर्षाकरीता घड्याळी तासीका तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात नेमणूकीबाबत.**

संदर्भ – जाहीरात क्र. दि. / ०७ /२०१९ प्रसिध्द झालेली जाहिरात.

महोदय,

संदर्भिय जाहिरातीनुसार मी घड्याळी तासीका तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात खालील नमुद पदाकरीता आवश्यक ती अर्हता धारण करीत असून सदरच्या पदासाठी निवड होण्याकरिता विहित नमुन्यातील अर्ज पुढीलप्रमाणे सादर करीत आहे.

१) माध्यम : [ ] ( ऊर्दु / हिंदी / इंग्रजी )

२) ज्या पदासाठी अर्ज करावयाचा आहे ते पद : [ ] ( सहा. शिक्षक/ पदवीधर ).

३) पदवीधर पदासाठी अर्ज असल्यास पदवीचा विषय [ ] (भाषा/विज्ञान/समाजशास्त्र)

४) संपूर्ण नाव : [ ] [ ] [ ]
(आडनाव) ( स्वत:चे नाव ) ( वडिलांचे/पतीचे नाव )

५) पत्रव्यवहाराचा पत्ता : ____________________
____________________ पिनकोड :

६) मोबाइल नंबर : [ ] ई-मेल आय डी: [ ]

७) जन्मतारीख : (दिनांक / महिना / वर्ष) (......./......./१९......) वय : .......वर्षे ..... महिने.

८) लिंग : स्त्री [ ] / पुरुष [ ]

९) जात : .................................... प्रवर्ग : ...............................(उदा.अ.जा./अ.ज./खुला,)

१०) ज्या पदासाठी अर्ज केला आहे त्या पदासाठीची जाहिरातीनुसार धारण केलेली शैक्षणिक अर्हता :

| अ.क्र | शैक्षणिक अर्हता | पदवीचा विषय | उत्तीर्ण वर्ष | एकुण गुण | प्राप्त गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | एच.एस.सी. | | | | | |
| २ | डी.एड. | | | | | |
| ३ | बी.ए. | | | | | |
| ४ | बी.एड. | | | | | |
| ५ | बी.एस.सी. | | | | | |
| ६ | अनुभव प्रमाणपत्र | होय/नाही. सोबत प्रमाणपत्राची सत्यप्रत आवश्यक आहे. | | | | |

मी खाली सही करणार प्रमाणित करतो की, वर नमूद केलेला तपशील खरा व बरोबर असून त्याबाबत आवश्यक प्रमाणपत्रांच्या प्रमाणित प्रती सोबत जोडत आहे. तसेच वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळून आल्यास या माहितीच्या आधारे सदरची नियुक्ती तात्काळ रद्द होण्यास मी पात्र राहील. तसेच माझ्याविरुध्द कायदेशीर कारवाई केल्यास माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

(आपला/आपली विश्वासू )

स्थळ – अर्जदाराची सही____________________

दिनांक - /०७/२०१९ अर्जदाराचे नाव____________________

सोबत सहपत्रे– अर्जासोबत शैक्षणिक अर्हतेनुसार प्रमाणपत्रांच्या प्रमाणित सत्यप्रती सोबत जोडत आहे.

१) [ ] २) [ ] ३) [ ] ४) [ ] ५) [ ] ६) [ ]

clock basis teacher